# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.08.2024** **वारःरविवार**

---

•मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेनुसार 17 तारखेला रक्कम जमा करण्याचा, मुख्य कार्यक्रम पुण्यात होणार
•केशवराव भोसले नाट्यगृह पुन्हा उभारण्यासाठी 25 कोटींचा आराखडा
•हर घर तिरंगा मोहीमेद्वारे सर्वत्र चैतन्याचं वातावरण
•पुण्यात सापडले 1 कोटी रुपयांचे अमली पदार्थ
•ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचं निधन आणि
•पॅरीस ऑलिंपिकचा आज समारोप, सहा पदकांसह भारताची मोहीम पूर्ण

माझी लाडकी बहीण
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अर्ज केलेल्या सर्व बहिणींच्या खात्यात येत्या 17 तारखेला ओवाळणी म्हणून दोन महिन्याचे अनुदान जमा करण्यात येईल तसंच गेल्या २५ वर्षांपासून बंद पडलेला धुळे जिल्ह्यातील साक्री येथील पांझरा कान सहकारी साखर कारखाना आणि पंडित दीनदयाळ आदिवासी सूत गिरणी सुरु करण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करेल असं आश्वासन काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या धुळे दौऱ्यादारम्यान दिलं.

माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत 17 ऑगस्टला पुण्यात होणार असून त्यांच्या हस्ते ज्या महिलांचे अर्ज दिनांक 14 ऑगस्ट अखेरपर्यंत मंजूर होवून शासनास सादर झाले आहेत त्यांच्या खात्यामध्ये पैसे वर्ग होतील. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी होणार असून प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालक मंत्र्यांच्या उपस्थितीत महिला मेळावा होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. यापुढील प्राप्त अर्जांची कार्यवाही पुढे चालू राहणार असून ही योजना कायमस्वरूपी चालू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

केशवराव
कोल्हापूर इथं आगीत नष्ट झालेल्या केशवराव भोसले नाट्यगृहाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पाहणी केली. हे नाट्यगृह वर्षभरात पुन्हा उभारण्याची ग्वाही देताना त्यांनी त्यासाठी २५ कोटींचा आराखडा केला असल्याचं पाहणीनंतर पत्रकार परिषदेत सांगितलं. आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरी समिती नियुक्त केली आहे. समितीचा अहवाल आणि तपासाअंती नेमकं काय झालं ते निष्पन्न होईल, निष्काळजीपणा केला असेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असंही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं.

घघति

राज्यात घरोघरी तिरंगा मोहीम 15 ऑगस्ट पर्यंत राबवण्यात येत आहे. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते हिरवी झेंडा दाखवून तिरंगा यात्रा काढण्यात आली. या तिरंगा यात्रेत शहरातील १३ शाळांचे १ हजार पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

धाराशिव जिल्ह्यातील हरघर तिरंगा मोहिमेचा शुभारंभ पालकमंत्री तानाजी सावंत यांच्या हस्ते झाला. यामध्ये शाळेतील विद्यार्थी आणि उमेद महिला स्वयंसहायता गटातील महिलांनी तिरंगा फेरी काढून सामूहिक तिरंगा प्रतिज्ञा घेतली.

नागरिकांनी 13 ते 15 ऑगस्ट या काळात आपले घर, दुकान, खाजगी आस्थापना यावर स्वयंस्फुर्तीने राष्ट्रध्वज फडकवावा असं आवाहन नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी केलं आहे. या कालावधीत तिरंगा यात्रा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये महिला बचत गटांमार्फत तिरंगा मेळाही आयोजित करण्यात येणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या ग्रामपंचायती, नगर परिषदा आणि नगर पंचायतींमध्ये काल भर पावसातही तिरंगा यात्रा काढण्यात आली होती.

**CA**

नवीन कर प्रणाली, कर विषयक कायदे, आर्थिक जबाबदारी याबाबत लोकांना साक्षर करण्यासाठी सनदी लेखापालांनी पुढाकार घ्यावा असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या नागपूर शाखेच्या वतीनं आयोजित दोन दिवसीय विदर्भ अधिवेशनाचं उद्घाटन करताना फडणवीस बोलत होते.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात....

चोक्कलिंगम

नोकरशाहीनं निष्पक्ष आणि भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी अत्यंत तटस्थपणे आपली भूमिका पार पाडली पाहिजे, असं आवाहन राज्याचे प्रधान सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल सोलापूर इथं केलं. सोलापूर जिल्ह्यातील विशेष मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत आयोजित आढावा बैठकी चोक्कलिंगम यांनी मार्गदर्शन केलं.

हत्तीरोग

देशभरात हत्तीरोग निर्मूलनाच्या दृष्टिकोनातून प्रतिबंधात्मक गोळ्यांचं सेवन प्रत्येकानं करावं असं आवाहन केंद्रीय आयुष कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल केलं. हत्तीरोग निर्मूलनासाठी बुलडाण्यात सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेचं उद्घाटन दूरस्थ पद्धतीनं जाधव यांच्या हस्ते काल झालं त्यावेळी ते बोलत होते. यावर्षी एमडीए अभियानाच्या पहिल्याच टप्प्यात 11 राज्यातील 95 टक्के लाभार्थ्यांपर्यंत या प्रतिबंधात्मक गोळ्यांच वाटप करण्यात आलं आहे.

निळवंडे

निळवंडे धरणातून काल उच्चस्तरीय कालव्यांसह डाव्या आणि उजव्या कालव्यांचे पूजन करुन पाणी सोडण्यात आले. या पाण्याचा लाभ प्रथमच क्षेत्रातील शेतकऱ्यांना होत आहे, ही अतिशय समाधानाची बाब असून लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकऱ्याला पाणी मिळेल, असं नियोजन करण्याच्या सूचना अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या आधिकाऱ्यांना काल यानिमित्त दिल्या.

मातंग-मागण्या

मातंग समाजाच्या सर्व प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई काल नांदेड मध्ये केलं. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात राज्यातील समस्त मातंग समाजाच्यावतीने राज्यस्तरीय समाज मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते. राज्य शासनाने अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची मागणी पूर्ण केल्याबद्दल मातंग समाजानं राज्य शासनाचे जाहीर आभार मानले.

वाशिम कार्यक्रम

वाशिम तालुक्यातील माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांच्याकरिता काल सकाळी वाशिम तहसील कार्यालयात तालुका स्तरावर तहसिलदार निलेश पळसकर यांच्या उपस्थितीत "सैनिक हो तुमच्यासाठी"या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमामध्ये उपस्थितांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न आणि इतर समस्या निकाली काढण्यात आल्या.

परभणी महसूल विभागामार्फतही 'सैनिक हो तुमच्यासाठी' हा कार्यक्रम जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

यावेळी वीर पत्नी आणि माता-पिता यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसंच सैनिक कल्याण विभागाव्दारे माजी सैनिक, विधवा पत्नी यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी मदत, शिष्यवृत्ती, आर्थिक मदतीचे धनादेश देण्यात आले.

गमा-पालखी

पंढरपूरहून परतलेली श्री संत गजानन महाराजांची पालखी काल बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरामध्ये आल्यानंतर शेकडो वारकऱ्यांच्या समवेत खामगाव शहरातील विविध मार्गावरून मार्गस्थ झाली. यावेळी अनेक भक्तांनी पालखीचं दर्शन घेतलं. आज पहाटे पालखी शेगावकडे मार्गस्थ झाली.

अजनीरेल्वे

मध्य रेल्वेच्या अजनी रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकास कामासाठी पुढील 3 महिने अजनी इथला फलाट क्रमांक तीन बंद ठेवला जाणार आहे. या कामासाठी अजनी रेल्वे स्थानकावरून काही गाड्यांना थांबा रद्द करावा लागणार असून काही रेल्वे या नागपूर स्थानकावरून चालवल्या जाणाऱ्या असल्याची माहिती मध्य रेल्वे नागपूर विभागाचे विभागीय व्यवस्थापक मनिष अग्रवाल यांनी काल नागपुरात पत्रकार परिषदेत दिली.

पुणे-अमली-डेस्क

पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विभागानं लोहगाव परिसरात धाड टाकून एक कोटी रुपये किंमतीचा अमली पदार्थ जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. लोहगाव इथल्या विघ्नहर्ता अपार्टमेंट परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडे अमली पदार्थांचा साठा असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती.

निधन

ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं काल सकाळी त्यांच्या राहत्या घरी मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते 67 वर्षांचे होते. विजय कदम यांनी अनेक चित्रपट, नाटक, मालिकांमधून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. टूरटूर; सही दे सही;विच्छा माझी पुरी करा; पप्पा सांगा कुणाचे; अश्या अनेक गाजलेल्या नाटकांमधून त्यांनी भूमिका केल्या. मराठी चित्रपटांमध्ये 1980 ते 1990 दरम्यानच्या दशकात त्यांनी साकारलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहेत. विजय कदम यांनी अनेक मराठी मालिका आणि काही हिंदी मालिकांमध्येही अभिनय केला होता. विजय कदम आणि त्यांच्या पत्नी पद्मश्री यांनी 'विजयश्री नाट्यसंस्था' सुरु केली. त्या माध्यमातून त्यांनी अनेक वर्षे देश परदेशात नाटकांचे प्रयोग केले.

निधन

पंढरपूर येथील संत साहित्याचे आणि वेदांताचे गाढे अभ्यासक पांडुरंग गणेश तथा बाळशास्त्री हरीदास यांचं काल पंढरपूर इथे वृद्धापकाळाने निधन झालं. ते 92 वर्षांचे होते.

ऑलिंपिक

एकंदर सहा पदकांसह भारताची पॅरीस ऑलिंपिकमधील मोहीम काल अधिकृतपणे समाप्त झाली. आज या स्पर्धांचा समारोप होत आहे. कुस्तीपटू रितिका हुडा महिलांच्या 76 किलो वजन गटात उपांत्य फेरी गाठू शकली नाही. पुरुषांच्या 57 किलो गटात अमन सेहरावतचं कास्य पदक यावेळी भारताला कुस्तीमध्ये मिळालेलं एकमेव पदक ठरलं. भारतीय खेळाडूंनी एक रौप्य आणि पाच कास्य पदकं जिंकली. 2028 च्या ऑलिंपिक स्पर्धा लॉस एंजेलिस इथं भरणार आहेत.

हवामान

कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.